**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ४६०९/ ६३ दिनांक :- १९ ऑक्टोबर, २०२३

प्रसिद्धीपत्रक

# म्हाडा मुख्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

मुंबई, दि. १९ ऑक्टोबर, २०२३ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती अर्थात वाचन प्रेरणा दिनानिमित्त वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात 'छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक व शिवचरित्रपर साहित्य' या विषयावर ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. बाबासाहेब कांबळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या प्रसंगी प्रा. डॉ. बाबासाहेब कांबळे यांनी म्हाडा कर्मचाऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित अनेक पुस्तकांचे नव्याने ओळख करून देत छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे चरित्र पुन्हा एकदा अवलोकन करण्याची नव्या पिढीला गरज असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. कांबळे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी राज्याभिषेक करून सर्वांना सोबत घेत सर्वसमावेशक, सार्वभौम, रयतेचे स्वराज्य स्थापन केले. या राज्याभिषेकाद्वारे राजघराण्याचा वारसा नसणारी, महाराष्ट्राचा भूमिपुत्र असणारी सामान्य व्यक्ति एका सार्वभौम राज्याचा राजा होऊ शकतो हा प्रेरणादायी संदेश त्यांनी अधोरेखित केला. छत्रपती शिवाजी महाराज यांचे सुमारे ४०० वर्षांपूर्वीचे सर्वसमावेशक धोरण हे आजही सर्वांसाठी आदर्श व प्रेरणादायी आहे. शिवाजी महाराजांनी मुघल साम्राज्य, कुतुबशाहा, आदिलशहा आणि यूरोपियन वसाहतवाद्यांशी लढा दिला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर त्यांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्याची उभारणी केली. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासामध्ये शिवाजी महाराजांचा मोठा प्रभाव आहे. शिवाजी महाराज सर्वांचे प्रेरणास्थान आहेत. कागदपत्रांच्या आधारावर इतिहास लिहिला जातो. वाचकांनी इतिहास

आधारित साहित्य वाचण्यावर भर दिला पाहिजे कारण हे साहित्य कागदोपत्री पुराव्यांच्या आधारावर निर्माण झाले आहे. वाचकांनी सर्व बाजूने या पुस्तकांचे वाचन केले तर छत्रपती शिवाजी महाराज आपल्याला समजून घेता येतील, असे प्रा. डॉ. कांबळे यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेल्या राज्यव्यवहार कोशामुळे मराठी भाषेचे संवर्धन करण्यामध्ये मोलाची भूमिका बजावली असून अनेक मराठी शब्द या कोशामुळे मराठी भाषेला मिळाले. शिवाजी महाराजांच्या काळात पर्शियन / फारसी भाषेचा प्रभाव होता, हा प्रभाव कमी करून मराठी भाषेचा प्रभाव वाढण्यास मदत झाली, असे प्रा. डॉ. कांबळे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला 'म्हाडा'चे मुख्य अभियंता श्री. धिरजकुमार पंदिरकर, सचिव श्री. राजकुमार सागर, उपमुख्य अभियंता श्री. अनिल अंकलगी, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, म्हाडा कर्मचारी पतपेढीचे अध्यक्ष श्री. सूर्यकांत तेली, म्हाडा कर्मचारी संघटनेचे प्रधान कार्यवाह श्री. मोहनराव कोळी आदींसह म्हाडातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन 'म्हाडा'चे जनसंपर्क अधिकारी तथा मराठी भाषा अधिकारी श्री. हेमंत पाटील यांनी केले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण



